**MHKO100008042019**

## रे.क.नं. १७१/२०१९ मधील निशाणी क्र. २१ वरील आदेश

प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "*विना कैफीयत चौकशी*" आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचा अर्ज व त्यावर वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ अशिक्षीत वयोवृध्द महिला असून प्रतिवादी क्र. २ ते ५ या सुध्दा अशिक्षीत महिला आहेत. त्यामुळे दावा मिळकतीसंबंधी जुन्या कागदपत्रांच्या सही शिक्क्याच्या नक्कला मुदतीत प्राप्त करुन घेता आल्या नाहीत. तसेच प्रतिवादी हे वेगवेगळया ठिकाणी राहणेस असून ते माहिती व कागदपत्रे देवून कैफीयत तयार करुन कैफीयतीवर सहीकरीता उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे कैफीयत देणेस विलंब झालेला आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. वादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन असे कळविले आहे की, प्रस्तुत अर्जातील कथने संयुक्तीक नाहीत. प्रतिवादी यांनी कैफीयत देणेस जाणुनबुजून विलंब केलेला आहे. सबब सदरचा अर्ज खर्चादाखल रुपये ५०००/- रक्कम देणेच्या अटीवर मंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**४.** वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापनासाठी व कायम मनाई होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी यांची कैफीयत व म्हणणे अभिलेखावर येणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांची कैफीयत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. मी या ठिकाणी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे (नागपूर बेच) मधील ***Municipal Council, Hinganghat, Dist. Wardha V/s. Sudhirkumar Krushnakumar Sahani reported in 2010(3) Mah. L.J. Page No. 948 Bom. H.C. (Nagpur Bench)*** या न्यायनिर्णयाचा आधार घेत आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये "*Outer after limit for filing written statement is 90 days from the date of service of*

*summons but where sufficient ground and reasons are shown the application though filed belatedly and casually, deserves to be allowed.*" असे अभिमत व्यक्त करण्यात आलेले आहे. प्रतिवादी यांनी आपली कैफीयत व म्हणणे दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना त्याचेवर त्यांनी केलेल्या उशीरासाठी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

**१)** प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचा निशाणी क्र. २१ वरील अर्ज, वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास मात्र ) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादी यांना अदा केल्यानंतर प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.
(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2021.01.02 12:32:03 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०१/०१/२०२१

(म. ता. खराडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज